# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम

सहकार हाईट (पाच मजली इमारत), पहिला मजला, महानगरपालिका बिल्डींग, डिवाईन चर्च जवळ,
मिनाताई ठाकरे मंडईच्या बाजूला, रामदेव पार्क, मिरा रोड (पू.) ४०१ १०७ ईमेल : dtomhmbd@rntcp.org


जा.क्र.मनपाराक्षदुका/ 229 /2024-25 दि. 08/01/2025

**प्रति,**
मा. उपायुक्त (सार्व आ)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय** :- राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातंर्गत mbmc.gov.in, My mbmc App व Commercial website वर माहिती प्रसारित करणेबाबत.

**संदर्भ** :- मा. अति आयुक्त (1) यांचे जा.क्र.मनपा/माहिती व तंत्रज्ञान/294 /2023-24 दि. 04/12/2024 रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, mbmc.gov.in, My mbmc App व Commercial website वर माहिती प्रसारित करण्याबाबत कळविण्यात आले होते. तरी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाबाबतची सर्व माहिती आपणांस पुरविण्यात येत आहे.

सोबत माहिती जोडत आहे.

**(डॉ. बालनाथ चकोर)**
**शहर क्षयरोग अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Scanned with CamScanner

# राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम
# मिरा भाईंदर महानगरपालिका

- **प्रस्तावना**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम मिरा भाईदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सन 2005 पासून स्वतंत्ररित्या सुरु करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे उदिदष्ट असे आहे की, जास्तीत जास्त संशयीत क्षयरुग्ण शोधणे व त्यामधून क्षयरोगाचे निदान करुन रुग्णांना मोफत तपासणी, औषधोपचार व मृत्यूदर कमी करणे हा उददेश आहे. क्षयरोगाचे पर्यवेक्षण करण्यासाठी एक शहर क्षयरोग अधिकारी कार्यालय व त्याअंतर्गत चार क्षयरोग पथके मंजुर करण्यात आले आहेत. संशयीत क्षयरुग्णांचे तपासणी करण्याकरीता दहा सुक्ष्मदर्शक केंद्र व सात नॅट साईट कार्यरत आहेत.

- **कर्तव्य**

क्षयरुग्णांस मोफत तपासणी, औषधोपचार इतर लाभ पुरविण्यात येत आहे.

- **कामकाज**

शासनाकडून प्राप्त झालेल्या इष्टांकानुसार उदिदष्ट पुर्ण करण्यास मदत करणे. ते करुन घेणे. निक्षय सॉफटवेअर तसेच निक्षय औषधी प्रणालीवर अदयावत करणे.

- **जॉबचार्ट**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातंर्गत कार्यक्रमाचे सनियंत्रण व्यवस्थापन व पर्यवेक्षण सुरळीत चालण्यासाठी शासनाने नेमून दिलेल्या पदनिर्मिती नुसार अधिकारी व कर्मचाऱ्यांचे जॉबचार्ट खालील प्रमाणे

1. **शहर क्षयरोग अधिकारी** - राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम संपुर्ण सहनियंत्रण ठेवणे. वेळोवेळी कार्यक्रम सुरळीत चालण्यासाठी मार्गदर्शन करणे. शासनाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सुचना, प्रशिक्षण, इतर इष्टांक पुर्ण करुन घेण्यास आढावा सभा घेणे.
2. **वरिष्ठ डॉटस प्लस टी. बी. एच. आय. व्ही पर्यवेक्षक** - राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम सुरळीत चालण्याच्या दृष्टिकोनातून शहर क्षयरोग अधिकारी यांना मदत करणे. Drug Resistant तसेच TBHIV रुग्णांचे पर्यवेक्षण करणे. अहवाल अदयावत करणे व सदरची माहिती वेळोवेळी शहर क्षयरोग अधिकारी व शासनास अवगत करणे.
3. **जिल्हा पब्लिक प्रायव्हेट मिक्स समन्वयक** - राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम सुरळीत चालण्याच्या दृष्टिकोनातून शहर क्षयरोग अधिकारी यांना मदत करणे. सरकारी व खाजगी क्षेत्राचे कामकाज पाहणे, पर्यवेक्षण करणे. तसेच अहवाल अदयावत करणे व सदरची माहिती वेळोवेळी शहर क्षयरोग अधिकारी व शासनास अवगत करणे.
4. **जिल्हा लेखापाल** - राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम सुरळीत चालण्याच्या दृष्टिकोनातून शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचे वेळेत व्यवस्थापन करणे. लेखापरिक्षण अहवाल अदयावत करणे. अंदाजित अंदाजपत्रक शासनास सादर करणे.

Scanned with CamScanner

लेखापाल या नात्याने सर्व रजिस्टर व इतर अदयावत माहिती शहर क्षयरोग अधिकारी व शासनास अवगत करणे.

5. **संगणक चालक** - शासनाकडून प्राप्त झालेले ई-मेल शहर क्षयरोग अधिकारी यांच्या निर्देशनास आणून देणे. ईमेलची देवाण घेवाण, अहवाल इतर बाबी क्षयरोग पथक निहाय व शासनस्तरावर वेळोवेळी प्राप्त करुन देणे. शासनाकडून प्राप्त झालेले सर्व इष्टांक पुर्ण करुन शासनास आवश्यक ती माहिती पुरविणे.
6. **वैदयकीय अधिकारी क्षयरोग पथक** - क्षयरोग पथक निहाय कार्यक्रमाचे पर्यवेक्षण करणे. क्षयरोग पथक निहाय सर्व इष्टांक पुर्ण करुन शहर क्षयरोग अधिकारी यांना माहिती अदयावत करणे.
7. **वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक** - सुक्ष्मदर्शक केंद्र / नॅट साईटचे पर्यवेक्षण करणे. सुक्ष्मदर्शक केंद्रांची आर.बी.आर.सी करणे. तसेच सुक्ष्मदर्शक केंद्रांना संशयीत रुग्ण तपासणीसाठी लागणारे साहित्य पुरविणे व सर्व इष्टांक वेळोवेळी शहर क्षयरोग अधिकारी / शासनास अवगत करुन देणे.
8. **वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक** - क्षयरोग पथकांतर्गत येणाऱ्या सर्व आरोग्य केंद्र / रुग्णालये यांचे पर्यवेक्षण करणे. निदान झालेल्या क्षयरुग्णांचे पर्यवेक्षण करणे. रुग्णांचे इष्टांक पुर्ण करुन घेणे व वेळोवेळी माहिती वैदयकीय अधिकारी क्षयरोग पथक व शहर क्षयरोग अधिकारी यांना अवगत करुन देणे.
9. **क्षयरोग आरोग्य कार्यकर्ता** - आरोग्य केंद्र / रुग्णालये निदान झालेल्या रुग्णांचे इष्टांक पुर्ण करुन घेणे. रुग्णांचा पत्ता तपासून घेणे. रुग्णांच्या सहवासितांना TPT अंतर्गत औषधोपचार देणे. वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक यांना इष्टांक पुर्ण करुन तसेच क्षयरोग निदान झालेल्या रुग्णांची माहिती वेळोवेळी अदयावत करुन देणे.
10. **प्रयोगशाळा तंत्रज्ञ** - सुक्ष्मदर्शक केंद्र / नॅट साईट ला आलेल्या संशयीत क्षयरुग्णांचे / निदान झालेल्या रुग्णांचे, खाजगी क्षेत्रातून संदर्भित केलेल्या रुग्णांची तपासणी करुन घेणे. त्यांचे अहवाल वेळोवेळी अदयावत करुन घेणे. सुक्ष्मदर्शक केंद्राची OEC संदर्भात वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक यांना मदत करणे. तसेच वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक यांना वेळोवेळी माहिती अदयावत करुन देणे.

➢ **कर्मचाऱ्यांची माहिती**

| अ. क्र | नाव | पद | मोबाईल क्रमांक | कामकाजाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. राजेंद्र सुरेश पवार | वरिष्ठ डॉटस प्लस टी. बी. एच. आय. व्ही पर्यवेक्षक | 9594991015 | शहर क्षयरोग अधिकारी कार्यालय |
| 2 | श्री. परमेश्वर माणिक भादेकर | जिल्हा पब्लिक प्रायव्हेट मिक्स समन्वयक | 8108556655 | शहर क्षयरोग अधिकारी कार्यालय |
| 3 | श्रीम. रसिका राजेंद्रकुमार पाटील | जिल्हा लेखापाल | 8451831320 | शहर क्षयरोग अधिकारी कार्यालय |

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | श्रीम. मृणाल परेश जोशी | संगणक चालक | 8976226535 | शहर क्षयरोग अधिकारी कार्यालय |
| 5 | श्री. किरण दुधंबी आमले | वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक | 8452835732 | क्षयरोग पथक भाईदर, मिरारोड, नवघर व बंदरवाडी |
| 6 | श्री. भुषण हरेश्वर किणी | वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक | 8454022255 | क्षयरोग पथक भाईदर |
| 7 | श्री. सचिन केशवराव जाधव | | 8424062999 | क्षयरोग पथक मिरारोड |
| 8 | श्री. दिपक बाळकृष्ण पाटील | | 9702699006 | क्षयरोग पथक नवघर |
| 9 | श्री. रोहित मधुकर गोडसे | | 9664606780 | क्षयरोग पथक भाईदर, मिरारोड, नवघर व बंदरवाडी |
| 10 | श्री. आकाश तानाजी राठोड | | 8459415640 | क्षयरोग पथक बंदरवाडी |
| 11 | श्री. भास्कर रामदास ठाकरे | क्षयरोग आरोग्य कार्यकर्ता | 9867755797 | आरोग्य केंद्र उत्तन, मुर्धा व गणेश देवल नगर |
| 12 | श्री. ज्ञानेश्वर पंढरी कंधारे | | 9987124835 | आरोग्य केंद्र भाईदर (प) व भा. पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय |
| 13 | श्रीम. प्रियंका रमेश जाधव | | 9653266605 | आरोग्य केंद्र बंदरवाडी |
| 14 | श्री. बालाजी किशनराव पदम | | 7977986589 | आरोग्य केंद्र पेणकरपाडा |
| 15 | श्री. पवन शंकर साखरे | | 7972862656 | आरोग्य केंद्र मिरारोड |
| 16 | श्री. अमोल वाघु पवार | | 7666624998 | आरोग्य केंद्र स्व इंदिरा गांधी रुग्णालय |
| 17 | श्री. मिलिंद मारुती काते | | 9892318144 | आरोग्य केंद्र काशिगाव |
| 18 | श्री. परशुराम बारक्या लहांगे | | 9271400160 | आरोग्य केंद्र आयडीएल पार्क |
| 19 | कु. हर्षल अरविंद गायकवाड | | 9011841690 | आरोग्य केंद्र नवघर |
| 20 | श्रीम. सुप्रिया अमेय राणे | | 8422961461 | आरोग्य केंद्र बंदरवाडी |
| 21 | श्रीम. सुकन्या सचिन करंडे | | 9321697636 | आरोग्य केंद्र उत्तन |

Scanned with CamScanner

| 22 | श्रीम. तरन्नुम मो. इशराक सिध्दीकी | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 9082257718 | आरोग्य केंद्र मिरारोड |
|---|---|---|---|---|
| 23 | श्रीम. शहाना दानिश खान | | 9819698534 | स्व. इंदिरा गांधी रुग्णालय |
| 24 | कु. हर्षा सुरेश धेंडे | | 9820673046 | स्व. इंदिरा गांधी रुग्णालय |
| 25 | श्री. शैलेश राठोड | | 8369073764 | आरोग्य केंद्र काशिगाव |

➢ **शासन निर्णय व परिपत्रक**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम हा शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविला जातो. तसेच 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या आर्थिक वर्षात व 1 जानेवारी ते 31 डिसेंबर 2024 या रिपोर्टींग अहवालानुसार शासनाकडून उपलब्ध झालेले पत्र यांच्या अधिन राहून राबविला जात आहे.

➢ **अंदाजपत्रके**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम हा शासनास पाठविलेल्या अंदाजपत्रकानुसार व त्याअनुशंगाने उपलब्ध झालेल्या निधीनुसार शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविला जातो. तसेच प्राप्त झालेल्या निधीचा खर्च हा मासिक व त्रैमासिक SOE माध्यमानुसार शासनास लेखाजोखा पाठविण्यात येतो.

| आर्थिक वर्ष | शासनाकडे पाठविण्यात आला वार्षिक अंदाजपत्रक | शासनाकडून मंजुर झालेले अंदाजपत्रक | प्राप्त झालेला निधी | खर्च झालेला निधी | % |
|---|---|---|---|---|---|
| 2022-23 | 1443.67 | 237.15 | 219.00 | 219.00 | 100% |
| 2023-24 | 1250.22 | 111.63 | 87.92 | 87.92 | 100% |
| 2024-25 | 1680.60 | 160.11 | 93.28 | 91.28 | 98% |

➢ **प्रदान करण्यात आलेली देयके**

| FMR Code | Head |
|---|---|
| 75.1 | PPP-Diagnostic Sample Collection & Transportation |
| 75.1 | PPP-OOC (Other Operative Cost) Specialist Consultation |
| 75.1 | PPP-Diagnostic X-ray Outsourcing |
| 75.1 | PPP Diagnostic EPTB (Adult) |
| 75.1 | PPP Diagnostic EPTB (Child) |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| 75.3 | Outsourcing Lab Technician (LT) (Sharp Agency) |
| 77 | DRTB Diagnostic PTE |
| 78 | TB Harega desh jeetega - IEC & Printing - ACSM (State & district) |
| 78 | TB Harega desh jeetega - IEC & Printing - ACSM (State & district) |
| 78 | TB Harega desh jeetega - IEC & Printing - ACSM (State & district) |

➢ **विभागाने राबविलेले विविध कार्यक्रम यांची सविस्तर माहिती.**


1. **निक्षय मित्र संकल्पना** - मा. पंतप्रधान यांच्या PMTMBA या संकल्पनेतुन एकुण 86 निक्षय मित्र तयार करुन साधारण 2456 रुग्णांना 6 महिन्यासाठी फुड बास्केट वाटप करण्यात आले.
2. **सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम** - सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिमेतंर्गत विशि ष्ट लोकसंख्येनुसार प्रशिक्षीत पथकाव्दारे झोपडपटटी, स्थलांतरीत कामगार, वृध्दाश्रम, कंपनी व जे रुग्ण आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचू शकत नाही अशा लोकसंख्येचे मॅपींग करुन संशयीत क्षयरुग्ण शोधले जातात. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सन 2024-25 या आर्थिक वर्षात दि 23/12/2024 ते 03/01/2025 पर्यंत सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम एकुण लोकसंख्या 1148751 च्या 10 टक्के लोकसंख्या 114875 मध्ये राबविण्यात आली होती. त्यामध्ये साधारण 108744 लोकसंख्या तपासली असून त्यामध्ये 1629 संशयीत क्षयरुग्णांची तपासणी करण्यात आली व 30 लोकांचे निदान करण्यात आले.
3. **NGO-PP Scheme** - आरोग्य केंद्र व रुग्णालये येथे सर्व सेवा उपलब्ध नसतात. शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीनुसार क्षयरोगाचे निदान करण्यासाठी NGO-PP Scheme अंतर्गत (बाहयस्त्रोत यंत्रणेव्दारे) प्रायव्हेट डायग्नोस्टिक सेंटर MOU करुन सेवा पुरविल्या जातात.
4. **पेशंट प्रोव्हायडर मिटींग** - क्षयरोगाची माहिती क्षयरुग्णांना असणे अपेक्षित आहे. अर्धवट औषधोपचार सोडून न जाता रुग्ण औषधोपचार पुर्ण करतो. तसेच शासनाकडून क्षयरोग विषयक नवनवीन मार्गदर्शक सूचना तसेच सेवा, सुविधा व इतर लाभ क्षयरुग्णांना असणे आवश्यक आहे.
5. **कम्युनिटी मिटींग** - कम्युनिटी मिटींग व्दारे विशिष्ट गटाला क्षयरोग विषयक समुपदेशन केल्यास क्षयरोगाची माहिती प्राप्त होऊन संशयीत क्षयरुग्ण क्षयरोगाची तपासणी करण्यापासून वंचित राहिल्यास आरोग्य केंद्रापर्यंत रुग्ण तपासणीसाठी येऊ शकतो तसेच समाजाला क्षयरुग्णांची माहिती कम्युनिटी मिटींग व्दारे दिली जाते.

Scanned with CamScanner

6. **स्कुल ॲक्टीव्हीटी** - स्कुल ॲक्टीव्हीटी मार्फत लहान मुलांना शाळेत क्षयरोग विषयक निबंध, कलाकृती इ. तयार करुन क्षयरोग विषयक संदेश मुलांना शिकवण्यात येत असतो.
7. **प्रशिक्षण** - शासनाकडून क्षयरोग विषयक माहिती मध्ये होणारे नवनवीन बदल, सेवा, सुविधा, तपासणी, औषधोपचार याबददल आरोग्य कर्मचारी या नात्याने कर्मचाऱ्यांना क्षयरोग विषयक होणारे बदल माहिती असणे आवश्यक आहे. त्याअनुशंगाने कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.
8. **क्षयरोग विषयक आयईसी मटेरिअलचे वाटप** - विविध माध्यमातून जसे की, हस्तपत्रिका, बॅनर, स्टीकर्स यामधून क्षयरोग विषयक जनजागृती होण्यासाठी आयईसी मटेरिअलचे वाटप करण्यात येते. उदा.

➢ **छायांकित व माहिती**


1. **सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम**




Scanned with CamScanner

2. आरोग्य कर्मचारी यांचे प्रशिक्षण




Scanned with CamScanner

3. कर्मचारी यांची आठवडा आढावा बैठक



4. मासिक आढावा सभा



Scanned with CamScanner

5. वैदयकीय अधिकारी यांच्या प्रशिक्षणास संबोधित करतांना मा. अति आयुक्त (डॉ. संभाजी पानपटटे), जागतिक आरोग्य संघटना सल्लागार (डॉ. अविनाश जाधव)



लोकमत

# टीबीच्या रुग्णांना पोषण आहाराचे वाटप

## कॅन्सर कंट्रोल मिशनचा उपक्रम : रुग्णांना दिला आधार



मीरा-भाईंदर येथील इंदिरा गांधी रुग्णालयातील टीबीच्या रुग्णांना पोषण किटचे वाटप करण्यात आले. डॉ. शरद निखाते, टीबी अधिकारी डॉ. चकोर, अमोल पवार, कॅन्सर कंट्रोल मिशन एनजीओचे संस्थापक पुष्पेंद्र राज उपस्थित होते.

लोकमत न्यूज नेटवर्क


मुंबई : मीरा-भाईंदर येथील इंदिरा गांधी रुग्णालयातील टीबीच्या रुग्णांना पोषण किटचे वाटप करण्यात आले. यावेळी परमेश्वर भाडेकर यांचे सहकार्य मोलाचे ठरले. यावेळी डॉ. शरद निखाते, टीबी अधिकारी डॉ. चकोर, अमोल पवार, कॅन्सर कंट्रोल मिशन एनजीओचे संस्थापक पुष्पेंद्र राज, इतर सर्व एमबीएमसीचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

कॅन्सर कंट्रोल मिशन हे गेल्या १४ वर्षापासून कर्करोगाच्या मुलांना आणि प्री-मॅच्युअर मुलांना त्यांच्या वैद्यकीय उपचारांमध्ये मदत करते. आतापासून टीबी रुग्ण आणि वंचित मुलांना त्यांच्या आवश्यक पोषण किटसह आणि जास्तीत जास्त रुग्णांना आधार देण्यास सुरुवात केली आहे. तसेच या कॅन्सर कंट्रोल मिशन एनजीओने 'प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान' अंतर्गत नोंदणीही केली आहे.

Hello Thane
Page No. 2 Oct 24, 2024
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner


6. खाजगी वैदयकीय व्यवसायीक यांच्याकडे दिलेली भेट




7. सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम अंतर्गत कार्यक्षेत्रात पर्यवेक्षण



8. संशयीत क्षयरुग्ण शोधण्यासाठी वृध्दाश्रम ला दिलेली भेट




9. निक्षय पोषण योजनातंर्गत क्षयरुग्णांना वाटप करण्यात आलेला पोषण आहार





Scanned with CamScanner

10.पेशंट प्रोव्हायडर मिटिंग



11.एच आयव्ही बाधित रुग्णांना क्षयरोग विषयक समुपदेशन




Scanned with CamScanner

12.महानगर गॅस लिमिटेड यांच्याकडून सीएसआर फंडातून क्षयरुग्णांची तपासणी करण्यासाठी दोन ट्रुनॅट मशीन वाटप बाबतचा एमओयु करतांना




13) सन 2021 मध्ये महाराष्ट्रातील एकुण 80 जिल्हयांपैकी मिरा भाईंदर महानगरपालिकेने कार्यक्रमांतर्गत तिसरा क्रमांक पटकावला आहे.





MAHARASHTRA STATE
HEATLH DEPARTMENT
NATIONAL TUBERCULOSIS ELIMINATION PROGRAMME

CERTIFICATE OF ACHIEVEMENT

This Certificate is awarded to *Corporation Meera Bhayander* for an excellent performance in National TB Elimination Programme in the year 2021, through team work, for paving towards TB Elimination in Maharashtra.

Dr. Archana Patil
Director of Health Services
Pune

Dr. N. Ramaswami
Commissioner of Health
& MD NHM, Mumbai

Dr. Pradeep Vyas
Additional Chief Secretary
Health Dept. Maharashtra

Scanned with CamScanner

14) सन 2022 मध्ये महाराष्ट्रातील एकुण 80 जिल्हयांपैकी मिरा भाईंदर महानगरपालिकेने कार्यक्रमांतर्गत 92.52 गुण पटकावून प्रथम क्रमांक पटकावला आहे.




# पुण्य नगरी

## भारत क्षयरोग मुक्त करण्याच्या प्रयत्नात मीरा–भाईंदर महापालिका प्रथम

मीरा रोड : मीरा-भाईंदर महापालिकेने क्षयरोगमुक्त भारत हे धोरण २०२५ पर्यंत पूर्ण करण्यासाठी चांगले काम केले असून महाराष्ट्रात ८० जिल्ह्यांमध्ये मीरा-भाईंदर महापालिकेला प्रथम क्रमांक आला आहे. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत रुग्णाला तपासण्या, औषधोपचार व सेवा सुविधा मोफत पुरविल्या जातात. क्षयरोगाचे प्रमाण कमी करण्यासाठी जास्तीत जास्त संशयित क्षयरुग्ण शोधून त्यामधून रुग्ण निदान केले जाते.

प्रत्येक वर्षी शासनाकडून हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी ठरावीक उद्दिष्ट जिल्हा, महापालिका स्तरावर दिले जाते. केंद्र तसेच राज्य सरकारने राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त भारत करण्याचे धोरण निश्चित केले आहे. मीरा-भाईंदर



महापालिकेला २०२२ या वर्षासाठी संशयित क्षयरुग्ण शोधण्याचे प्रमाण प्रति एक लाख लोकसंख्येमागे ३४०० रुग्णांची आकडेवारी निश्चित केली होती. त्यानुसार सरकारी क्षेत्रासाठी अंदाजित २१ हजार व खासगी क्षेत्रासाठी अंदाजित १७ हजार असे एकूण ३८ हजार क्षयरुग्णांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी महापालिकेने विविध कार्यक्रमांतर्गत तसेच सरकारी व खासगी क्षेत्रात प्रत्यक्ष रुग्ण तपासणी मोहिमेंतर्गत २२ हजार ७८७ रुग्ण तपासले.

क्षयरुग्णांच्या निदानाचे उद्दिष्ट पाहता पालिकेने २०२२ या वर्षासाठी २८०० क्षयरुग्ण निदानाचे उद्दिष्ट पूर्ण केले. त्यामधून सरकारी क्षेत्रातून १२३७ रुग्ण निदान व खासगी क्षेत्रातून १३०६ रुग्ण निदान असे एकूण २५४३ रुग्णांचे निदान झाले आहे. तर एकूण २२८६ रुग्णांपैकी २०८४ रुग्ण बरे केले आहेत. ८० जिल्ह्यांमध्ये मीरा-भाईंदर महापालिकेने २२७८७ रुग्ण तपासून सर्वाधिक ९२.५२ गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे आयुक्त दिलीप ढोले यांनी समाधान व्यक्त करून पालिकेच्या क्षयरोग विभागातील अधिकारी डॉ. बालनाथ चकोर यांच्यासह विभागातील कर्मचारी व इतर खासगी क्षेत्र या सर्वांच्या कामाचे कौतुक केले आहे.

Scanned with CamScanner

15) ठाणे विभागीय अंतर्गत येणारे जिल्हे / 7 महानगरपालिका यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेने खाजगी क्षेत्रातील केलेल्या कामाची प्रशंसा करुन महानगरपालिकेने केलेला मॅडल आपआपल्या ठिकाणी राबविण्याबाबत राज्यस्तरीय पथकाने दिलेला सल्ला

FREE PRESS

# Mira-Bhayandar becomes role model for entire MMR in fight against TB

SURESH GOLANI / Mumbai

Municipal corporations and councils under the jurisdiction of the Mumbai Metropolitan Region (MMR) will soon implement the Mira Bhayandar Municipal Corporation's (MBMC) model to eradicate tuberculosis.

The Union Ministry of Health and Family Welfare aims to make the country TB-free by 2025 under the National TB Elimination Programme (NTEP) by emphasising four areas: Build, prevent, detect and treat.

Taking into consideration the fact that a large number of people with TB seek diagnosis and treatment from private entities, which leads to delay or under-reporting of cases, the MBMC has roped




in all private hospitals and medical stores to get timely information about suspected patients approaching them for treatment or medicines.

Those alerting the MBMC's health department about unreported patients get Rs500 for the information and another Rs500 once the patient recovers.

The health department has also created WhatsApp groups to which private establishments and chemists have to report any TB related information on a daily basis. The department has been conducting health check-up camps and door-to-door visits across the twin city especially at construction sites and industrial areas.

"Impressed by the elaborate exercise, the state government had asked us to divulge details about the working process to our counterparts in MMR," said additional civic chief Dr Sambhaji Panpatte.

In response, a seminar was organised in Bhayandar on Wednesday in which a detailed presentation was held in the presence of participants, including Dr Anirudha Kadu, TB consultant for the World Health Organization, Dr Rajabhau Yerde, team lead of the state technical support unit, and TB officers from various cities.

Notably, the MBMC had bagged the first spot in the state last year by scoring 92.52 marks for its excellent performance in the fight to eliminate TB.

07/07/2023 | FPJ Mumbai | 4 Source : https://epaper.freepressjournal.in/

16)मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात केंद्रीय पथकाने दिलेल्या भेटीनुसार खाजगी क्षेत्रातील क्षयरोग विषयक कामाची केलेली प्रशंसा

पुढारी

# क्षयरोग दुरीकरणाबाबत प्रशंसा

भाईंदर : राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत आरोग्य कुटुंब
कल्याण मंत्रालयाकडून नॅशनल स्ट्रॅटेजिक प्लाननुसार २०१७ ते
२०२५ पर्यंत क्षयरोग दुरीकरणाचे महत्वकांक्षी लक्ष ठेवण्यात आले
आहे. हे लक्ष गाठण्यासाठी मिरा-भाईंदर महापालिकेने शहरातील
सरकारी व खाजगी रुग्णालयांचा सहभाग नोंदवून राष्ट्रीय क्षयरोग
दुरीकरण कार्यक्रमांतर्गत २०२२ मध्ये खाजगी क्षेत्रात क्षयरोगाचे निदान
होण्याचे प्रमाण १०७ टक्के इतके प्राप्त केले होते. पालिकेच्या या
कामगिरीचा केंद्रीय पथकाकडून आढावा घेण्यात येऊन पालिकेने
केलेल्या कामगिरीची प्रशंसा केल्याचे आयुक्त दिलीप ढोले यांनी
सांगितले. २ व ३ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण
कार्यक्रमांतर्गत सरकारी व खाजगी रुग्णालयातील पालिकेच्या कामाची
पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक आले होते. या पथकाने पालिका
क्षेत्रातील क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाला प्रतिसाद देणाऱ्या तुंगा
हॉस्पिटल, तन्वर हॉस्पिटल, पोरवाल डायग्नोस्टिक सेंटर, पल्स
डायग्नोस्टिक सेंटर, खाजगी रुग्णालयातील रुग्णांच्या घरी भेट देत होत
असलेल्या उपचारांची माहिती घेतली. २०२३ मध्ये सरकारी व खाजगी
रुग्णालयातील क्षयरोग रुग्ण निदान होण्याचे प्रमाण अनुक्रमे ८७ व ९३
टक्के इतके निश्चित करून हे प्रमाण मागील वर्षापेक्षा १९ टक्क्यांनी
वाढल्याचे क्षयरोग विभागाचे प्रमुख अधिकारी डॉ. बालनाथ चकोर
यांनी सांगितले. यासाठी पालिकेने २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात
केलेली तरतूद १०० टक्के खर्च केली असून ठाणे विभागांतर्गत
असलेल्या सात महापालिकांमध्ये मिरा-भाईंदर महापालिकेचे काम
चांगले असल्याचे पथकाच्या निदर्शनास आल्याचे त्यांनी सांगितले.

Thane Edition
Aug 5, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner

17) सन 2023 मध्ये महाराष्ट्रातील एकुण 80 जिल्हयांपैकी मिरा भाईंदर महानगरपालिकेने कार्यक्रमांतर्गत दुसरा क्रमांक पटकावला आहे.

[illegible]

Scanned with OKEN Scanner

MAHARASHTRA STATE
PUBLIC HEALTH DEPARTMENT
NATIONAL TUBERCULOSIS ELIMINATION PROGRAMME

CERTIFICATE OF ACHIEVEMENT

This certificate is awarded to *Mira Bhayander Municipal Corporation for* an excellent performance in National Tuberculosis Elimination Programme in the year 2023, through team work, for paving towards Tuberculosis Elimination in Maharashtra.

*District has scored Second Rank in State (As per GOI TB Index Score)*

Dr. Sunita Golhait
Joint Director, Health Services
(TB & Leprosy), Pune

➢ **इतर आवश्यक माहिती**

1) निक्षय पोषण योजने अंतर्गत सरकारी व खाजगी क्षयरुग्णांना औषधोपचार सुरु झाल्यापासून उपचार संपेपर्यंत प्रत्येक महिन्यास रु. 1000/- लाभ दिला जातो.
2) आरोग्य केंद्रास व रुग्णालयास क्षयरुग्ण कळविल्यास रु. 500/- मानधन अदा केले जाते.

Scanned with CamScanner

3) खाजगी वैदयकीय व व्यवसायीक यांनी क्षयरुग्ण कळविल्यास व औषधोपचार पुर्ण करुन घेतल्यास रु. 500/- + 500/- = 1000/-
4) क्षयरुग्णांच्या प्रकारानुसार देखरेखी खाली औषधोपचार पुर्ण करुन घेतल्यास (Treatment Supporter) आर्थिक मोबदला दिला जातो.
   अ) प्राथमिक स्वरुपाचा टि.बी (6 महिने) रु. 1000/-
   आ) H-Mono औषधोपचार घेतलेला क्षयरुग्ण 6 महिने रु. 1000/-
   इ) Drug Resistant TB IP Phase रु. 2000/- व CP Phase रु. 3000/-
5) TB Preventive Teropy औषधोपचार पुर्ण करुन घेतल्यास Treatment Suppoer (6 महिन्यासाठी) रु. 250/- मानधन प्रति व्यक्ती अदा केले जाते.
6) जेथे सुक्ष्मदर्शक केंद्र उपलब्ध नाहीत, तेथून सुक्ष्मदर्शक केंद्रापर्यंत संशयीत क्षयरुग्णांचे थुंकी नमुने ने-आण करण्यासाठी प्रति थुंकी नमुना (अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकानुसार ठरवून दिलेल्या दराप्रमाणे) मानधन दिले जाते.

➢ **माहिती अधिकार अधिनियन 2005 कलम 4(1)ख अन्वये प्राप्त झालेले अर्ज**

| अ.क्र | विषय | उत्तर |
|---|---|---|
| 1 | मी सार्वजनिक आरोग्य विभागात राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातंर्गत वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक या पदावरती होतो महाराष्ट्र प्यारा वैदयकीय परिषदेकडे नोंदणी नसल्यामुळे माझी सेवा समाप्त करण्यात आली. तरी शासनाकडून माझ्या पदासाठी महाराष्ट्र प्यारा वैदयकीय परिषदेकडे नोंदणी असणे आवश्यक आहे असे पत्र किंवा जीआर आपणांस प्राप्त झाला असेल त्याची प्रत व माझी सेवा समाप्त करण्यासाठी आपण बनवलेला प्रस्ताव याची प्रत मला माझे ईमेल वरती पाठवण्यात यावी. | दि. 18/11/2024 रोजी आपल्या ईमेल आयडीवर माहिती पाठविण्यात आली होती |
| 2 | सार्वजनिक आरोग्य विभागातील राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातंर्गत कर्मचाऱ्यांना 2023 मध्ये दिवाळी सानुग्रह अनुदान मिळालेल्या कर्मचाऱ्यांची नावे व कोणाला किती अनुदान मिळाले याची माहिती ई-मेल वरती पाठवण्यात यावी. | दि. 09/12/2024 रोजी आपल्या ईमेल आयडीवर माहिती पाठविण्यात आली होती. |
| 3 | सार्वजनिक आरोग्य विभागातील आस्थापनेवरील, राष्ट्रीय आरोग्य | दि. 20/12/2024 रोजी आपल्या ईमेल आयडीवर माहिती पाठविण्यात आली होती. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | अभियानातील, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ व वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक या सर्वांची लाईन लिस्ट व कोणाकडे महाराष्ट्र पॅरावैदयकीय परिषदेकडे नोंदणी आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्राची प्रत व नोंदणी प्रमाणपत्र नाही त्यांची ही लाईन लिस्ट ही सर्व सुधारित माहिती ईमेल वरती पाठविण्यात येत आहे. | |

➢ **माहिती अधिकार पत्र / उत्तर माहिती, माहितीचा अधिकारी प्राप्त अपील व उत्तरे**

| अ.क्र | विषय | संदर्भ | उत्तर |
|---|---|---|---|
| 1 | सार्वजनिक आरोग्य विभागातील आस्थापनेवरील, राष्ट्रीय आरोग्य अभियानातील, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ व वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक या सर्वांची लाईन लिस्ट व कोणाकडे महाराष्ट्र पॅरावैदयकीय परिषदेकडे नोंदणी आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्राची प्रत व नोंदणी प्रमाणपत्र नाही त्यांची ही लाईन लिस्ट ही सर्व सुधारित माहिती ईमेल वरती पाठविण्यात येत आहे. | मा. प्रथम अपिली अधिकारी तथा उपायुक्त (वैदयकीय आरोग्य) मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दि. 24/12/2024 रोजी जा.क्र.अपिल/माआधि /उपा./58/2024-25 अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत दिलेला निर्णय. | दि. 26/12/2024 रोजी अपिलार्थी यांना माहिती देण्यात आली. |
| 2 | सार्वजनिक आरोग्य विभागातील राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातंर्गत कर्मचाऱ्यांना 2023 मध्ये दिवाळी सानुग्रह अनुदान मिळालेल्या कर्मचाऱ्यांची नावे व कोणाला किती अनुदान मिळाले याची माहिती ई-मेल वरती पाठविण्यात येत आहे. | मा. प्रथम अपिली अधिकारी तथा उपायुक्त (वैदयकीय आरोग्य) मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दि. 24/12/2024 रोजी जा.क्र.अपिल/माआधि/उपा. /59/2024-25 अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत दिलेला निर्णय. | दि. 26/12/2024 रोजी अपिलार्थी यांना माहिती देण्यात आली. |

Scanned with CamScanner